## पाठ – ९

## निर्णय प्रक्रियेत अवलंबिली जाणारी पद्धत

सदरचा विभाग अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) आणि सह आयुक्त (सामान्य प्रशासन) यांच्या पर्यवेक्षणाखाली काम करत असल्यामुळे, सक्षम प्राधिकरणाची मान्यता व मंजुरी घेतल्यानंतर सर्व धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

या विभागाला महानगरपालिकेने वेळोवेळी निर्धारित केलेली प्रमाणके व नियमांचे पालन करावे लागते. महानगरपालिकेची कार्यपद्धती व साखळी यानुसार निर्णय प्रक्रियेत जनसंपर्क विभागात केल्या जाणाऱ्या खर्चाकरीता अथवा कामाच्या कंत्राटाच्या अंमलबजावणीकरीता सह आयुक्त (सामान्य प्रशासन), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर), स्थायी समिती (विशिष्ट प्रकरणी) यांची पूर्व मंजुरी अथवा कार्योत्तर मंजुरी घ्यावी लागते. जनतेला माहिती देणे, त्यांच्या तक्रारी, व्यथा ऐकणे, प्रसिद्धी व जनसंपर्क उपक्रम यासारखे नेहमीच्या स्वरुपाचे निर्णय विभागातील अधिकारी घेतात.